# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

## प रि प त्र क

क्र.बीजीए/पेन्शन/०१/२०२३. दिनांकः- १० जानेवारी, २०२३.

सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांचे आस्थापनेवर काम करित असलेले अधिकारी/कर्मचारी आर्थीक वर्ष २०२१-२०२२ मध्ये तसेच वेळोवेळी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या तसेच मृत पावलेल्या अधिकारी/कर्मचा-यांची निवृत्ती वेतन विषयक प्रकरणे म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम १२०, १२१(१) (सी), १२२ आणि १२३(१) मध्ये नमुद मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तयार करून त्यांना अंतीम स्वरूप देण्याची जबाबदारी विद्यापीठातंर्गत कार्यालय प्रमुखांची आहे.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, सांबंधित कार्यालय प्रमुख सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्तीवेतन विषयक प्रकरणे वेळेत तयार करून अंतिम मंजुरीसाठी विद्यापीठ प्रशासनास सादर करीत नसल्यामुळे सेवानिवृत्त विद्यापीठ कर्मचाऱ्यांची सदर प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होतो. परिणामी संबंधित सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी त्यांना देय असणारे सेवानिवृत्तीवेतनविषयक लाभाचे वितरण करण्यास विलंब होतो.

**असेही निदर्शनास आले आहे की, सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे सादर झाल्यावर त्यामध्ये काही त्रुटी आढळुन येतात त्यामुळे सदर प्रकरण निकाली काढण्यास विलंब होतो. त्रुटीमुक्त सेवानिवृत्ती प्रकरण सादर होण्याकरिता या परीपत्रकासह जोडलेली तपासणी सुची (Check List) सेवानिवृत्ती प्रकरणासोबत न-चुकता जोडण्यात यावी जेणेकरून सेवानिवृत्तीवेतन प्रकरणामध्ये त्रुटी राहण्याची शक्यता कमी होईल.**

म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम १२२ नुसार कार्यालय प्रमुखांनी शासकिय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपुर्वी जास्तीत जास्त सहा महिन्याच्या आत नमुना ६ चा भाग एक पुर्ण करणे क्रमप्राप्त आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाद्वारे सेवानिवृत्त होत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्त होण्याच्या सहा महिन्यापुर्वी पुर्वसुचना निर्गमित केल्या जातात. सदर सुचना निर्गमित झाल्यापासुन सेवानिवृत्ती प्रकरण सादर करण्याची तयारी करणे अपेक्षित आहे परंतू असे होत असल्याचे आढळुन येत नसल्यामुळे आपणास पुनश्चः एकदा सुचित करण्यात येते की सेवानिवृत्तीवेतन प्रकरण उपरोक्त **उल्लेखित तपासणी सुचीसह** या कार्यालयास सेवानिवृत्ती दिनांकाच्या एक महिन्याआधी सेवानिवृत्तीवेतन प्रकरण प्राप्त होणे आवश्यक आहे जेणेकरून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्काचे सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभ वेळेवर प्रदान करणे सोईचे होईल.

मा. कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**प्रतः- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.**

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) नियंत्रक अधिकारी,(सर्व)------------------------------------------

३) कार्यालय प्रमुख सर्व ------------------------------------------

४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.

५) प्रभारी अधिकारी,

उपकुलसचिव(आस्था)
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

क्र.वीजीए/पेन्शन/०१/२०२३. दिनांक:- १० जानेवारी,२०२३.

## तपासणी सुची (Check List)

**सेवानिवृत्तीवेतन प्रकरण तयार करुन कुलसचिव कार्यालयास मंजुरीकरिता पाठविण्यापुर्वी खालील बाबींची पुर्तता झालेली आहे यांची खात्री करून घेण्यात यावी.**

| अ.क्र | तपासावयाच्या बाबी | होय/नाही |
|---|---|---|
| १ | मुळसेवापुस्तकातील प्रथम पृष्ठावरील इतर सर्व नोंदी तसेच जन्मतारखेबाबतची नोंद स्वतंत्ररित्या साक्षांकित केलेली आहे का ? | होय/नाही |
| २ | प्रथम नियुक्ती झालेल्या पदाची व त्या पदावर रूजु झाल्याची नोंद विद्यापीठ आदेश क्र. व दिनांकासह घेतलेली आहे का ? | होय/नाही |
| ३ | प्रथम नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचारी वैद्यकिय दृष्टया काम करण्यास सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेतलेली आहे का ? | होय/नाही |
| ४ | दि. ०१.०४.१९७६, १९८६,१९९६, २००६ व २०१६ ला झालेल्या सुधारीत वेतननिश्चितीची (Pay Fixation Approval) नोंद तसेच इतर वेतनविषयक नोंदी लेखाधिकारी, स्थानिक निधी लेखा डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे कडुन पडताळणी केल्याची नोंद मुळसेवापुस्तकात घेतलेली आहे का? | होय/नाही |
| ५ | प्रथम स्तरावर सरळसेवेद्वारे झालेल्या नियुक्तींचा परिविक्षा कालावधी (ProbationPeriod)समाधानकारक पार पाडल्याची नोंद मुळसेवापुस्तकात घेतलेली आहे का? | होय/नाही |
| ६ | संपुर्ण अर्हताकारी सेवेचा कालावधी पडताळल्याची नोंद (Service Verification) मुळसेवापुस्तकात घेतलेली आहे का? | होय/नाही |
| ७ | देय झालेल्या रजेचा हिशेब पुन्हा तपासणी करून त्यानुसार रजेच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेतल्या आहेत किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. अर्जित रजेच्या हिशोबाची नव्याने बेरीज (Recasting) करण्यात आलेली आहे का? | होय/नाही |
| ८ | वार्षिक वेतनवाढ (Incrememt) नियमितपणे दिल्या गेली किंवा नाही. | होय/नाही |
| ९ | सेवानिवृत्ती पुर्वसुचना तसेच आदेशाची नोंद सेवापुस्तकात घेतलेली आहे का. ? | होय/नाही |
| १० | विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल/डॉ. पं.दे.कृ.वि., कर्मचारी सहकारी पतसंस्था यांचे "ना-हरकत प्रमाणपत्र" तसेच कार्यालयीन कोणत्याही प्रकारची वसुली नसल्यास नादेय प्रमाणपत्र प्रकरणासोबत जोडलेले आहे का? | होय/नाही |
| ११ | अंतिम वेतन प्रमाणपत्र (LPC) प्रकरणासोबत जोडलेली आहे का? | होय/नाही |
| १२ | अर्जित रजेचे रोखीकरण केल्यानंतर त्याबाबची नोंद मुळसेवापुस्तकात घेवुन रजेचा हिशोब निरंक केल्याची नोंद घेतलेली आहे का? | होय/नाही |
| १३ | "ना-विभागीय चौकशी" व ना- मागणी प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्यांचे स्वाक्षरीने व नियंत्रण अधिकाऱ्याचे प्रतिस्वाक्षरीने सादर केलेले आहे का? | होय/नाही |
| १४ | निवृत्तीवेतन प्रकरणामध्ये आवश्यक त्या ठिकाणी साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या तसेच ठिकाण व दिनांक नमुद करण्यात आले आहे काय? | होय/नाही |
| १५ | मुळसेवापुस्तकात कार्यमुक्त/पदमुक्त केल्याबाबतची नोंद घेण्यात आली आहे का? | होय/नाही |
| १६ | सेवानिवृत्तीवेतन प्रकरणासोबत अंशराशीकरण अर्ज जोडुन त्यावर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यानी अर्ज सादर केल्याची दिनांक नमुद केलेली आहे का? | होय/नाही |
| १७ | नियंत्रक यांचे परीपत्रक क्र. अप्रवि/पेन्शन/७२५/२०२१, दि. १७.०८.२०२१ अन्वये स्थायित्व प्रमाणपत्राची नोंद मुळसेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे का? | होय/नाही |
| १८ | सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकी प्रदान केल्याची नोंद मुळसेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे का? | होय/नाही |
| १९ | सेवानिवृत्तीवेतन प्रकरणामध्ये नमुद नामनिर्देशित सदस्यांची जन्मतारखेबाबतचे पुरावे प्रकरणासोबत जोडलेले आहे का? | होय/नाही |

आहरण व संवितरण अधिकारी कार्यालय प्रमुख